# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक : - २५ ऑगस्ट, २०२५

---

जळगाव (प्रतिनिधी) दि. २५ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळा अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंती दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाईंच्या कवितेतील अध्यात्म या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मंचावर विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व विचारधारा प्रशाळचे संचालक प्रा. म. सु. पगारे, प्रा. सी. एस. पाटील, प्रा. प्रकाश सपकाळे बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राचे विभागप्रमुख प्रा. नितीन बडगुजर उपस्थित होते.

परिसंवादाचे वक्ते प्रा. प्रकाश सपकाळे बोलताना म्हणाले की, बहिणाबाई यांनी "मही माय सरस्वती, मले शिकवती बोली" या कवितेच्या माध्यमातून त्यांचे आध्यात्मिक ज्ञान किती प्रगाढ होत हे दिसून येते. माणसाच्या प्रत्येक विकारावर त्यात अहंकार, भय या विषयावर त्यांनी अगदी सोप्या भाषेत कविता करून मराठी साहित्यात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.

परिसंवादाचे वक्ते प्रा. सी एस पाटील म्हणाले की, शरीरातील सर्व अवयवांची जागा ठरली आहे पण मनाची जागा ठरली आहे का? मानवी मनाचा ठाव घेण्याचे काम बहिणाबाईंनी आपल्या कवितेतून करत समाजाचे प्रश्न मांडले. सर्व संतांनी आपल्या विचारातून मानवी मनावर काम करा हे सांगितले तेच आपल्या कवितेतून बहिणाबाई समाजासमोर मांडले आहे.

आयोजित परिसंवादात अध्यक्षीय भाषणात प्रा. पगारे म्हणाले की, बहिणाबाई चौधरींच्या कवितांमध्ये अध्यात्म हा अतिशय गाभ्याचा भाग आहे. त्यांचे काव्य हे केवळ ग्रामीण जीवनाचे चित्रण नसून त्यामध्ये भक्ती, आत्मज्ञान आणि अध्यात्मिक चिंतन यांचा सखोल आविष्कार दिसून येतो. बहिणाबाईंचे अध्यात्म हे साधेपणातील अध्यात्म असून त्यांनी उपदेशपर भाषा न वापरता रोजच्या साध्या जगण्यातून आध्यात्मिक तत्त्वे सांगितल्याचे देखील ते म्हणाले.

प्रा. नितीन बडगुजर यांनी प्रास्ताविकात कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्रामार्फत सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खेमराज पाटील तर आभार प्रदर्शन गौरव हरताळे यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या सभागृहात या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता